**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय**
**तिसरा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**
**दिनांक : ३.२.२०१६**

**परिपत्रक क्रमांक 454 दिनांक ३.२.२०१६**

मुख्यालयातील प्रमाणित प्रती साक्षांकित करण्याचे अधिकार यापुढे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई कार्यालयातील अधिक्षक (न्याय), अभिलेखा शाखा यांना प्रदान करण्यात येत आहे.

मुख्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या प्रमाणित प्रतीकरीता आकारण्यात येणारे शुल्क स्विकारण्याचे कामकाज सकाळी ९.४५ ते दुपारी १.३० पर्यंत या वेळेत श्री.एस.पी.शेणॉय, वरिष्ठ लिपीक, मुख्यालय यांनी करावे. जमा होणाऱ्या शुल्कामधुन जास्त जमा रकमेचा परतावा (Refund) श्री.शेणॉय यांनी त्याच दिवशी संबंधितांना करावा. दिवसअखेर जमा व परतावा रकमेचा ताळमेळ श्री.शेणॉय यांनी घेऊन दिवसअखेरची शिल्लक रक्कम मुख्यालयातील लेखापाल, सार्वजनिक न्यास प्रशासन निधी यांचेकडे हस्तांतरीत करावे.

जे पक्षकार संकेतस्थळावरून निकालाच्या प्रती डाऊनलोड करुन नक्कल विभागात सादर करतील त्या प्रतींसाठी प्रत्येक पान रु.४/- अशा दराने शुल्क आकारुन त्या प्रती तात्काळ प्रमाणित करुन देण्यात याव्यात.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त-१/२, मुख्यालय / बृहन्मुंबई
धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई
लेखा संचालक, मुंबई
सहायक लेखा संचालक, मुख्यालय / बृहन्मुंबई